# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ

## COVID WARRIORS ACTIVITY

- दि.६ एप्रिल २०२० रोजी आरोग्य विज्ञान संकुल व आरोग्य केंद्र यांच्या वतीने कोव्हीड वॉरीयर्स नावाने व्हाटसएप समूह तयार करण्यात आला. सदर समूहामध्ये जे विद्यार्थी अथवा नागरिक कोव्हीड आजाराच्या लढाईत स्वेच्छेने काम करू इच्छित होते अशांचा समावेश करण्यात आला. यातील स्वयंसेवकानी खालील प्रमाणे स्थानिक प्रशासनास मदत केली

  १. काही स्वयंसेवक हे सिव्हील रुग्णालय सोलापूर यांच्या आवाहनास प्रतिसाद देऊन सोरेगाव येथील Swab Collection केंद्र येथे रुजू झाले. या केंद्रात त्यांनी तेथील वैद्यकीय पथकास मदत केली. यातील काही स्वयंसेवकांनी Swab घेण्याचे प्रशिक्षण घेतले व यातील आरती हुल्ले हि विद्यार्थिनी महापालिका आरोग्य विभागात Swab Collector म्हणून रुजू झाली व आजअखेर कार्यरत आहे.

  २. योग शिक्षक अभ्यासक्रमाचे विद्यार्थी डॉ.राहुल नवले यांनी सिंहगड कोव्हीड केअर सेंटर येथे तसेच श्री.शिवानंद पाटील यांनी केटरिंग महाविद्यालय येथील कोव्हीड केअर सेंटर येथे दाखल असलेल्या रुग्णांना योग व प्राणायाम यांचे प्रशिक्षण दिले.

  ३. काही स्वयंसेवक हे शहर व ग्रामीण पोलीस आयुक्तालयाने केलेल्या आवाहनास प्रतिसाद देत पोलीस मित्र म्हणून रुजू झाले व लॉकडाऊन काळात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी कार्यरत होते.

4G 7:38 0.00 KB/s

Vo)) LTE 4G 52

COVID 19 Volunteer Form

Ads



# COVID 19 Volunteer Form

Your response has been recorded.

Submit another response

This form was created inside Solapur University, Solapur. Report Abuse

Google Forms

98% 6:20 AM

**दिव्य मराठी विशेष** • व्हॉट्सॲपच्या समूहातून आजी-माजी विद्यार्थ्यांनी घेतला रुग्णसेवेसाठी पुढाकार

# विद्यापीठाचा कोविड वॉरियर्सचा समूह मदतीस

प्रतिनिधी । सोलापूर

कोविड १९ मुळे उद्‌भवलेल्या आपत्कालीन प्रसंगी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठाचे कोविड वॉरियर्स जिल्हा रुग्णालयाच्या मदतीसाठी पुढे सरसावले आहेत. विद्यापीठातील आरोग्य विज्ञान संकुलातील आजी माजी विद्यार्थी यांचा कोविड वॉरियर्स नावाने एक व्हॉट्सॲपचा समूह संकुलाचे समन्वयक डॉ. अभिजित जगताप यांनी तयार केला. या सर्व मुलांना प्रशिक्षित करून त्यांना सामान्य जनता आणि प्रशासनाच्या मदतीला धाडले आहे.

ही युवा मंडळी कोविड आजाराबद्दल जनजागृती करणे, समुपदेशन करणे, वेळप्रसंगी जिल्हा प्रशासन जी काही मार्गदर्शनाखाली काम करत आहे. याखेरीज या स्वयंसेवकांच्या माध्यमातून आरोग्य सेतू ॲपचा प्रसार करणे, रोगप्रतिकारक शक्ती वाढण्यासाठी आहार व व्यायाम यांची माहिती देण्यासाठी यूट्यूबच्या माध्यमातून व्हिडिओ प्रसार करणे इत्यादी कामे चालू आहेत. या समूहात वय वर्ष १८ ते ६५ पर्यंतच्या वयोगटातील व्यक्तींचा समावेश असून त्यात डॉक्टर, आहारतज्ञ, योग प्रशिक्षक, ॲक्युप्रेशर तज्ञ, मायक्रोबायोलॉजीस्ट आदींचा समावेश आहे. समाजाप्रती असलेली बांधिलकी जपत हे स्वयंसेवक विनामूल्य सेवा देत आहेत. २५ विद्यार्थी सध्या सोलापुरात विविध स्तरावर काम करत आहेत. काहींनी सोरेगाव येथे तर काहींनी जिल्हा रुग्णालयात, काहींनी सिंहगड कॉलेजमध्ये असलेल्या केंद्रात कर्तव्य पार



विद्यापीठाच्या आरोग्य विभागात कोविड वॉरियर्स समूहातून काम करताना स्वयंसेवक.

महिन्यापासून कार्यरत आहेत. नुकतेच या स्वयंसेवकांची एक टीम सोरेगाव येथील एसआरपी कॅम्प येथे संशयितांचे नमुने घेणे, त्या संदर्भातील आवश्यक ते फॉर्म्स भरणे या

## जनतेची सेवा करण्यासाठी सज्ज

*ॲक्युप्रेशर या शास्त्रशुद्ध शिक्षणाच्या प्रशिक्षणानंतर गेली अनेक दिवस व्हॉट्सॲप समूह कार्यरत होता. या समूहात मी कोविड वॉरियर म्हणून या संदर्भात सेवा करण्याकरिता कोणी उत्सुक असेल तर नक्की सांगा, असा संदेश दिला होता. पाहता पाहता शंभर-सव्वाशे लोकांनी सकारात्मक उत्तर दिले. त्यातील २० लोक हे जिल्हा रुग्णालय व प्रशासन यांना मदत करत आहे. काही लोक तांत्रिक बाजू सांभाळत आहेत. सगळ्यांनी एक रुपयाही न घेता काम सुरू ठेवले आहे. केवळ सामान्य जनतेला व प्रशासनाला मदत मिळावी हा प्रामाणिक हेतू आहे.*

**डॉ. अभिजित जगताप,** आरोग्य विज्ञान

मा



सोलापूर

सोलापू
खाल्ले
विक्रीला
होती. स
सध्य
नाही. इं
मासे वि
रुपये), 
रुपये), 

Open Thumbnail
1 2 3 4




Shot on Y91
vivo dual camera





# ओळखपत्र

## Special Police Officer

नाव प्रलाद मिहिरी खोबरे.

मो. नंबर : 9881322988

कार्यक्षेत्र : जोडभावी पेठ पो.स्टे

सन : २०२०-२१

300

पोलिस आयुक्त

सोलापूर शहर